**SAMPLE CONTENT**

CBSE PERFECT PREP

# मराठी

POEMS EXPLAINED VIA VIDEOS




CLASS X

- Includes MCQs & variety of questions
- Solved previous years' Board Questions & SQP
- Model Paper for self assessment
- Visual explanation of Poems via QR code


सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.



Target Publications® Pvt. Ltd.

Written as per the latest board paper pattern prescribed by the Central Board of Secondary Education

# CBSE PERFECT PREP

# मराठी

## CLASS X

### Salient Features

- Based on the latest paper pattern and Board syllabus
- Contains a variety of question types: Descriptive, Objective, Explanatory and Multiple Choice Questions
- Includes comprehensive coverage of Grammar Topics with easily understandable explanations and extensive exercises
- Includes extensive coverage of Writing Skills Topics with a diverse range of questions
- Includes interesting feature like 'Enrich Your Knowledge'
- Contains challenging grammar questions to facilitate in-depth study
- Covers solved questions from Previous Years' Board Papers and SQP till 2023
- Includes video explanation for poems (accessible via Q.R Code)

Scan the given **Q.R. code** in *Quill - The Padhai App* to view the Model Question Paper along with the Answer Key.

Scan the given **Q.R. code** in *Quill - The Padhai App* to view the Board Curriculum.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 10597

TEID: 3277

# PREFACE

*"Learning never exhausts the mind." - Leonardo da Vinci.*

The class X marks a critical phase in a student's academic journey, and everyone aspires to experience a smooth transition. It can be a challenge for students to comprehend the syllabus in a way that is reasonable and simple. That's where proper guidance and a need for organised notes comes in.

**Target's 'CBSE PERFECT PREP Marathi: Class X'** is a meticulously crafted, comprehensive book designed to aid students in their preparation for the CBSE Class X Examination. It goes beyond just being a study resource; it serves as a bridge, connecting students with the curriculum and making it more approachable. This book is not just a study aid; it's a key that unlocks linguistic abilities, making the language enjoyable for students. It aims to do more than just prepare students for exams; it strives to tap into their logical capabilities and undiscovered talents.

The flow chart on the following page will guide you through the book's key features and explain how they have been meticulously crafted to enhance student learning.

We are confident that this book will serve as a valuable and enlightening companion for both students and teachers, nurturing a deeper understanding of the subject and facilitating academic success. As John Dewey once said, "Education is not preparation for life; education is life itself."

The journey to create a complete book is strewn with triumphs, failures and near misses. If you think we've nearly missed something or want to applaud us for our triumphs, we'd love to hear from you.
Please write to us at: mail@targetpublications.org

Publisher
**Edition:** First

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी अक्षरभारती; Fourth Reprint : 2022' published by the National Council of Educational Research and Training (NCERT) and NCERT Exemplar: 2018 published by the National Council of Educational Research and Training (NCERT) and the Department of Education in Science & Mathematics (DESM). We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the National Council of Educational Research and Training (NCERT). Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# KEY FEATURES

**वैविध्यपूर्ण प्रश्न (Wide Variety of Questions And Answers)**

Covers a diverse array of questions (including Objective, Explanatory, Descriptive, Multiple Choice Questions etc.) based on the text and poems, along-with their answers

**शब्दार्थ आणि वाक्प्रचार (Glossary and Phrases)**

Marathi and English meanings of difficult words and phrases from the chapters

**टिपा (Notes)**

Clear and straightforward explanation of difficult concepts to enhance students' deeper understanding

**गद्यांशांवर / कवितेवर आधारित बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Questions)**

Coverage of various multiple choice questions based on prose/poetry

**व्याकरण विभाग (Grammar Section)**

This section covers all the Grammar topics in accordance with the latest syllabus, offering straightforward explanations and abundant practice exercises

Continued...

Sample Content

**अपठित गद्यांश व पद्यांश (Unseen Passage & Poem)**

Comprehensive coverage of unseen passages and poems for thorough study

**Challenging Grammar Questions**

Challenging grammar questions are provided to elevate students' understanding of grammar topics

**लेखन विभाग (Writing Skills)**

This section covers various Writing Skills topics along-with easy explanation and thorough practice

**Questions from Board paper and SQP**

Covers solved questions from Board papers and SQP (Solved Question Paper) till 2023

**Enrich your Knowledge**

Additional knowledge regarding a topic to facilitate a more profound understanding of the topic

**भावार्थ कथन करणारे व्हिडिओ (Narrative Videos)**

Explanatory videos for easy understanding of the poems given through Q.R code

Sample Content

## अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1. | तू बुद्धी दे | गुरू ठाकूर | 1 |
| 2. | संतवाणी - अ. अंकिला मी दास तुझा | संत नामदेव | 5 |
| 3. | शाल | रा. ग. जाधव | 10 |
| 4. | उपास | पु. ल. देशपांडे | 18 |
| 5. | दोन दिवस (कविता) | नारायण सुर्वे | 30 |
| 6. | चुडीवाला | जयश्री रुईकर | 37 |
| 7. | फूटप्रिन्ट्स | डॉ. प्रदीप आवटे. | 47 |
| 8. | ऊर्जाशक्तीचा जागर | डॉ. रघुनाथ माशेलकर | 56 |
| 9. | औक्षण (कविता) | इंदिरा संत | 65 |
| 10. | रंग साहित्याचे | | 71 |
| 11. | खरा नागरिक | सुहास बारटक्के | 82 |
| 12. | स्वप्न करू साकार (कविता) | किशोर पाठक | 91 |
| | **स्थूलवाचन** | | |
| 1. | मोठे होत असलेल्या मुलांनो.... | डॉ. अनिल काकोडकर | 97 |
| 2. | व्युत्पत्ती कोश | | 100 |
| | **व्याकरण विभाग** | | |
| 1. | शब्दांच्या आठ जाती | | 102 |
| 2. | लिंग (ओळख / बदल) | | 108 |
| 3. | वचन (ओळख / बदल) | | 112 |
| 4. | समानार्थी शब्द | | 116 |
| 5. | विरुद्धार्थी शब्द | | 120 |
| 6. | काळ (ओळख / बदल) | | 123 |
| 7. | वाक्याचे प्रकार – आज्ञार्थी, विधानार्थी, उद्गारवाचक, प्रश्नार्थक (ओळख/बदल) | | 126 |
| 8. | समास | | 130 |
| • | Challenging Grammar Questions | | 136 |
| | **वाचन व आकलन** | | |
| 1. | अपठित गद्यांश | | 138 |
| 2. | अपठित पद्यांश | | |
| | **लेखन विभाग** | | |
| 1. | निबंधलेखन | | 162 |
| 2. | कथालेखन | | 174 |
| 3. | पत्रलेखन | | 183 |


Sample Content

Boost your score in the Board Examination with our **CBSE Competency Based Questions (Mathematics): Class X.** Scan the adjacent QR code to know more.

Boost your score in the Board Examination with our "**CBSE Competency Based Questions (Science): Class X".** Scan the adjacent QR code to know more.

Don't lose out on marks in grammar, vocabulary and writing skills. Practice more and score full with Target's **CBSE English Grammar & Writing Skills: Class X**. Scan the adjacent QR Code to know more.

Sample Content

# 1 तू बुद्धी दे

पाठ

– गुरू ठाकूर

## कवितेचा आशय

'तू बुद्धी दे' या प्रस्तुत गुरू ठाकूर लिखित प्रार्थनेत सन्मार्ग, सन्मती व सत्संगतीचे महत्त्व कवीने ठळकपणे मांडले आहे. सत्याची, सुंदरतेची कायम कास धरता यावी, संवेदनशील वृत्ती जपण्यास बळ मिळावे, दुर्बलांचा सोबती होण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, शाश्वत सौंदर्याचा ध्यास लागावा अशी प्रार्थना कवी परमेश्वराजवळ व्यक्त करत आहे.

sample content

## शब्दार्थ (Glossary)

| | |
|---|---|
| आजन्म | जन्मभर (lifelong) |
| आस | इच्छा (wish) |
| खल | दुष्ट, वाईट (bad, evil) |
| झेपावणे | भरारी घेणे (here, flight of a bird) |
| तयांचा | त्यांचा (their) |
| दुर्बल | कमजोर, शक्तिहीन (weak) |
| धमनी | (artery) |
| नवचेतना | नवचैतन्य (spirit) |
| नित्य | नेहमी (always) |
| नीती | सदाचाराचे नियम (morality) |
| भ्रष्ट | अप्रामाणिक (corrupt) |
| रुधिर | रक्त (blood) |
| रंध्र | छिद्र, रोम (pores) |
| सत्संगती | चांगल्या सज्जन माणसांची सोबत (company of virtuous people) |
| सन्मती | सद्बुद्धी (wisdom) |
| सन्मार्ग | चांगला मार्ग (right path) |
| सर्वथा | सदैव, सर्व अर्थांनी (always) |
| सहवास | सोबत, संगत (company) |
| साधना | मनापासून केलेली प्रार्थना (following something with dedication) |
| सारथी | येथे मार्ग, रस्ता, दिशा दाखवणारा (guide) |

## कवितेचा अर्थ (Meaning of Poem)

**'तू बुद्धि ...................................... ध्यास दे'**

हे ईश्वरा, तू आम्हांला बुद्धी, तेज, नवचैतन्य व विश्वास प्रदान कर. या जगात जे जे सत्य, सुंदर व शाश्वत (अनंत काळापर्यंत टिकून राहणारे) आहे अशा सौंदर्याचा जन्मभर ध्यास घेण्याचे बळ आम्हांला दे.

**'हरवले आभाळ ........................ तव सहवास दे'**

ज्यांच्या डोक्यावरून मायेचे छत्र हरवले आहे, अशा अनाथांचा तू सोबती बन, जे वाट चुकले आहेत, तू त्यांना मार्ग दाखवणारा सारथी बन.

हे परमेश्वरा, जे तुझी सदैव साधना करतात त्यांना तुझा नित्य सहवास घडू दे.

**'जाणावया ................................ जगण्यास दे'**

या जगातील असमर्थ, दुर्बल, दु:खी असणाऱ्यांची दु:खे व वेदना जाणवण्याकरिता आमच्या शरीरातील रोमारोमांत संवेदना सतत तेवत राहोत. शरीरातील धमन्यांतून वाहणाऱ्या रक्ताला दुष्ट, वाईट प्रवृत्तींचा नाश करण्याची आशा दे. आमच्या शब्दांना बळ प्राप्त होवो आणि आमच्या जगण्याला नवा अर्थ लाभू दे.

**'सन्मार्ग .................................... आकाश दे'**

आम्हांला सज्जनांची संगती लाभो, सद्बुद्धी लाभो, आयुष्यभर चांगल्या मार्गाने चालण्याची प्रेरणा मिळो. कितीही संकटे कोसळली तरी आमची नीती भ्रष्ट होऊ देऊ नको. आमच्या पंखांना मोकळ्या आकाशात भरारी मारण्यासाठी सामर्थ्य दे आणि झेपावण्याइतके विस्तीर्ण, मोकळे आकाश दे.

## व्याकरण (GRAMMAR)

**प्र.1. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?
   **[CBSE - SQP 2022 - 23]**
   A. धेनू – धरती B. उदक – उदर
   C. ऊब – आग **D. प्रण – प्रतिज्ञा**

2. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?
   **[CBSE - SQP 2023 - 24]**
   A. मुख **B. सोंड**
   C. वदन D. तोंड

3. खालील समानार्थी शब्दांची अयोग्य जोडी ओळखा.
   A. माती – मृदा B. राणी – राज्ञी
   C. जग – विश्व **D. कान – नासिका**

**प्र.2. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?
   **A. आदर × अनादर** B. आदर × निरादर
   C. पुढारी × माघारी D. उघड × बंदी

2. 'प्राचीन' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द –
   A. नवीन **B. अर्वाचीन**
   C. नूतन D. नवे

3. सुशिक्षित (सुयोग्य विरुद्धार्थी शब्द वापरा.) **[CBSE 2023]**
   A. अर्धशिक्षित B. निरक्षर
   **C. अशिक्षित** D. प्रशिक्षित

4. खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती? **[CBSE - SQP 2023 - 24]**
   A. आशा × निराशा B. उद्योगी × आळस
   C. कठोर × कठीण **D. सोय × गैरसोय**

**प्र.3. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.
   A. सांडणी B. लांडोर
   **C. कोकीळ** D. सिंहीण

2. लिंग बदला. – गायक **[CBSE - SQP 2020 - 21]**
   A. गौळण **B. गायिका**
   C. गायकी

3. 'राजा' या शब्दाचे लिंग बदला.
   A. दासी **B. राणी**
   C. नारी D. मानी

**प्र.4. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालीलपैकी एकवचनी शब्द कोणता? **[CBSE - SQP 2021 - 22]**
   A. वाघ **B. चित्ता**
   C. हत्ती D. सिंह

2. खालीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी शब्द कोणता?
   A. दात B. विद्यार्थी
   **C. किल्ले** D. नर्तिका

3. 'मुलगी' या शब्दाचा अनेकवचनी शब्द कोणता? **[CBSE - SQP 2020 - 21]**
   **A. मुली** B. मुले
   C. मुलगे

4. वचन बदला. शिंपला. **[CBSE - SQP 2020 - 21]**
   A. शिंपली B. शिंपी
   **C. शिंपले**

**प्र.5. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. अहाहा! किती सुंदर देखावा आहे हा!
   (या वाक्याचे विधानार्थी वाक्य कोणते?) **[CBSE - SQP 2020 - 21]**
   **A. हा देखावा फार सुंदर आहे.**
   B. हा देखावा सुंदर आहे काय?
   C. वा! सुंदर देखावा आहे हा.

2. किती छान आहात तुम्ही सगळे जण!
   (वाक्याचा प्रकार ओळखा.) **[CBSE 2023]**
   A. प्रश्नार्थक **B. उद्गारवाचक**
   C. आज्ञार्थी D. विधानार्थी

3. खालील वाक्याचा प्रकार ओळखा.
   नेहमी खरे बोलावे.
   A. प्रश्नार्थी **B. विधानार्थी**
   C. उद्गारार्थी D. आज्ञार्थी

**प्र.6. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालीलपैकी कोणते वाक्य वर्तमानकाळातील आहे. **[CBSE - SQP 2020 - 21]**
   A. हिरवे डोंगर खूप सुंदर होते.
   **B. हिरवे डोंगर खूप सुंदर आहेत.**
   C. हिरवे डोंगर सुंदर असणार.

2. सूर्य पूर्वेस उगवतो. (काळ ओळखा.)
   A. भविष्यकाळ B. भूतकाळ
   **C. वर्तमानकाळ**

3. राजा हरला. (काळ ओळखा.)
   A. वर्तमानकाळ **B. भूतकाळ**
   C. भविष्यकाळ

4. गोविंदाने आज सुट्टी घेतली आहे. (काळ ओळखा.) **[CBSE 2022]**
   **A. वर्तमानकाळ** B. भूतकाळ
   C. भविष्यकाळ D. साधा भविष्यकाळ

Sample Content

**प्र.7. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालीलपैकी भाववाचक नामाचा योग्य पर्याय कोणता ? **[CBSE - SQP 2023 - 24]**
   **A. विश्वास** B. धवल
   C. गंगा D. वारा

2. खालीलपैकी योग्य विधाने कोणती ? **[CBSE - SQP 2022 - 23]**
   (i) शब्दांच्या जातींमध्ये अव्यय प्रकारांना अविकारी म्हणतात.
   (ii) कारण या शब्दांच्या जातींमध्ये लिंग, वचन, विभक्ती यांच्यामुळे बदल होत नाही.
   A. 'i' बरोबर 'ii' चूक
   **B. 'i', 'ii' दोन्ही बरोबर**
   C. 'i', 'ii' दोन्ही चूक
   D. 'i' चूक, 'ii' बरोबर

3. खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते ? **[CBSE - SQP 2022 - 23]**
   A. पक्षी झाडावर बसला.
   B. दिव्याखाली अंधार झाला.
   C. गावाबाहेर जत्रा भरली .
   **D. तुटलेला पतंग खाली आला.**

**प्र.8. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?
   A. घरोघरी B. पदोपदी
   **C. पंचारती** D. यथाशक्ती

2. खालील सामासिक शब्दांचा समास ओळखा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा.
   पंचवटी
   **A. द्विगू समास**
   B. अव्ययीभाव समास
   C. इतरेतर द्वंद्व समास
   D. समाहार द्वंद्व समास

3. महाराष्ट्र, दररोज, चंद्रमुखी, यथाशक्ती यांपैकी अव्ययीभाव समासातील शब्द ओळखा.
   A. चंद्रमुखी, दररोज
   **B. दररोज, यथाशक्ती**
   C. महाराष्ट्र, चंद्रमुखी
   D. यथाशक्ती, महाराष्ट्र

4. या समासाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचा समावेश केलेला असतो; अशा समासाला ________ समास असे म्हणतात. **[CBSE - SQP 2023 - 24]**
   **A. समाहार द्वंद्व** B. इतरेतर द्वंद्व
   C. वैकल्पिक द्वंद्व D. द्विगू

**प्र.9. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.**

1. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.
   'सर्व <u>लेखक</u> आणि <u>संपादक</u> यांची एकत्र सभा झाली'.

**उत्तर :** सर्व **लेखिका** आणि **संपादिका** यांची एकत्र सभा झाली.

2. वचन बदला. **[CBSE 2020]**
   वही, माशी

**उत्तर :** वह्या, माशा

3. A. विनय गावी गेला. (भविष्यकाळ करा.) **[CBSE 2020]**
   B. काळ कधी थांबत नाही. (काळ ओळखा.)
   C. स्मिता कविता लिहिते.
   (वाक्याचा काळ ओळखून या वाक्याचे भूतकाळात रूपांतर करा.) **[CBSE 2022]**

**उत्तर :** A. विनय गावी जाईल. B. वर्तमानकाळ
C. वर्तमानकाळ.
स्मिताने कविता लिहिली.

4. खालील सामासिक शब्दांचा योग्य विग्रह करून समास ओळखा. **[CBSE 2022]**
   A. आजन्म B. नवरात्र
   C. भाजीपाला

**उत्तर :** A. जन्मापासून – अव्ययीभाव समास
B. नऊ रात्रींचा समूह – द्विगू समास
C. भाजीपाला वगैरे – समाहार द्वंद्व

5. A. मुलांच्या अभ्यासाची काळजी नको का ?
   (विधानार्थी वाक्य बनवा.) **[CBSE - SQP 2023 - 24]**
   B. राघव जबाबदार मुलगा आहे.
   (विधानार्थी नकारात्मक वाक्य बनवा.) **[CBSE - SQP 2023 - 24]**
   C. निसर्गाला कुठलाही धर्म नाही.
   (प्रश्नार्थक वाक्य बनवा.) **[CBSE - SQP 2023 - 24]**

Sample Content

D. देवा, सर्वांना सुखी ठेव!

(वाक्याचा प्रकार ओळखा.)

**[CBSE - SQP 2023 - 24]**

**उत्तर :** A. मुलांच्या अभ्यासाची काळजी हवी.

B. राघव बेजबाबदार मुलगा नाही.

C. निसर्गाला कुठला धर्म आहे का?

D. आज्ञार्थी वाक्य

6. काका अभिषेकच्या मागे धावत गेले.

(वाक्यातील सामान्य नामाच्या विरुद्धलिंगी शब्दाचा पर्याय वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

**[CBSE - SQP 2021 - 22]**

**उत्तर : काकी** अभिषेकच्या मागे धावत **गेली.**

7. काल मी मंदिरात गेलो.

(अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

**[CBSE - SQP 2019 - 20]**

**उत्तर :** क्रियापद

8. राघव दररोज व्यायाम करतो.

(अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

**[CBSE - SQP 2019 - 20]**

**उत्तर :**क्रियाविशेषण अव्यय

### प्र.10. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1. सोबती 2. वाट 3. नित्य
4. सामर्थ्य 5. संकट 6. रुधिर
7. दासी **[CBSE 2020]** 8. भूक **[CBSE 2020]**
9. माता **[CBSE 2020]** 10. कान **[CBSE 2020]**

**उत्तर :** 1. मित्र, सखा, सवंगडी 2. मार्ग, पथ
3. नेहमी 4. बळ, ताकद, शक्ती
5. विपत्ती 6. रक्त
7. सेविका 8. क्षुधा
9. जननी, माय 10. कर्ण

### प्र.11. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

1. सत्य × 2. विश्वास ×
3. दुर्बल × 4. नीती ×

**उत्तर :** 1. असत्य 2. अविश्वास
3. सबल 4. अनीती, कुनीती

### प्र.12. खालील शब्दांचे लिंग बदला.

1. नाग 2. मांजर
3. चिमणी 4. विद्यार्थी
5. दास 6. सेवक

**उत्तर :** 1. नागीण 2. बोका
3. चिमणा 4. विद्यार्थिनी
5. दासी 6. सेविका

Sample Content

Page no. **5** to **96** are purposely left blank. To

see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# 1 मोठे होत असलेल्या मुलांनो....

स्थूलवाचन

– डॉ. अनिल काकोडकर

## पाठाची पार्श्वभूमी

सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी मोठे होत असलेल्या मुलांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रात त्यांना 'भाभा अणुसंशोधन केंद्रामध्ये' आलेल्या अनुभवांचे कथन केले आहे. या अनुभवांच्या माध्यमातून त्यांनी मुलांना मोलाचे संदेश दिले आहेत. आपण स्वत:च स्वत:ला सक्षम करून स्वयंप्रेरणेने स्वत:चा मार्ग शोधावा हा संदेश ते देतात. तसेच, कोणतेही काम त्यातील तपशिलांसहित, बारकाव्यांसहित शिकून, करून दाखवावे असे लेखक म्हणतात. अशाप्रकारे, कामावर प्रभुत्व मिळवल्यानंतर ते इतरांकडून करून घेणे सहजशक्य होते, हा आयुष्यभर उपयोगी पडणारा धडा त्यांनी स्वानुभवातून मुलांना दिला आहे.

## शब्दार्थ (Glossary)

| | |
|---|---|
| ऊर्जा | चैतन्य, उत्साह (energy) |
| जवळपास | सुमारे (about) |
| प्रक्रिया | रीत, पद्धती (process) |
| प्रवृत्ती | वागण्याची तऱ्हा (tendency) |
| भूमिका | (role) |
| लघुरूप | संक्षिप्त रूप (short form) |
| वरिष्ठ | वरच्या हुद्द्यावरील (senior) |
| व्याप्ती | विस्तार (scope) |
| सक्षम | क्षमता असणारे (capable) |
| स्फूर्तिदायक | प्रेरणा देणारे (inspiring) |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ (Phrases & their Meaning)

| | |
|---|---|
| धडा शिकणे. | नवीन काही शिकणे.(to learn a lesson) |
| पाया घालणे. | सुरुवात करणे. (to lay the foundation) |
| मनावर कोरला जाणे. | मनावर ठसणे. (to imbibe) |

## सरावासाठी प्रश्न (EXERCISE)

**प्र.1. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

**1. बार्क म्हणजे काय? [CBSE 2020, 2023]**

**किंवा**

**'बार्क' हे कशाचे लघुरूप आहे? [CBSE - SQP 2020 - 21]**

**किंवा**

**'बार्क' या संस्थेच्या नावाचे विस्तारित रूप लिहा. [CBSE - SQP 2023 - 24]**

**उत्तर:** बार्क म्हणजे भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर म्हणजेच भाभा अणुसंशोधन केंद्र होय.

**2. अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला? [CBSE - SQP 2022 - 23]**

**उत्तर:** अणुसंशोधनाचा पाया डॉ. होमी भाभा यांनी घातला.

**3. लेखक ट्रेनिंग स्कूलसाठी बार्कला गेले तेव्हा संस्थेला किती वर्षे झाली होती?**

**उत्तर:** लेखक ट्रेनिंग स्कूलसाठी बार्कला गेले तेव्हा संस्थेला जेमतेम सात वर्षे झाली होती.

**4. लेखक ट्रेनिंग स्कूलसाठी बार्कला गेले तेव्हा किती मुले-मुली ट्रेनिंगला होती?**

**उत्तर:** लेखक ट्रेनिंग स्कूलसाठी बार्कला गेले तेव्हा शंभर मुले-मुली ट्रेनिंगला होती.

**5. लेखक ट्रेनिंग स्कूलला असताना डॉ. होमी भाभा तेथे किती वेळा आले?**

**उत्तर:** लेखक ट्रेनिंग स्कूलला असताना डॉ. होमी भाभा तेथे तीन-चार वेळा आले.

**6. डॉ. होमी भाभा यांचे व्यक्तिमत्त्व कसे होते?**

**उत्तर:** डॉ. होमी भाभा यांचे व्यक्तिमत्त्व प्रचंड स्फूर्तिदायक होते.

**7. कोणती प्रवृत्ती चुकीची आहे असे होमी भाभा यांनी म्हटले आहे? [CBSE - SQP 2020 - 21]**

**उत्तर:** बॉसने सांगितले तेवढेच काम करायचे आणि सांगितले नसेल, तर आपल्याला कामच नाही असे समजायचे, ही प्रवृत्ती चुकीची आहे असे होमी भाभा यांनी म्हटले आहे.



Sample Content

**8. बोट धरून चालवणे किंवा दिशा दाखवणे हे किती वयापर्यंत योग्य आहे असे लेखक म्हणतात ?**

**उत्तर :** बोट धरून चालवणे किंवा दिशा दाखवणे हे पहिल्या आठ-दहा वर्षांपर्यंत योग्य आहे असे लेखक म्हणतात.

**9. लेखक डॉ. अनिल काकोडकर बार्कमध्ये कोणत्या पदावर जॉईन झाले ?**

**उत्तर :** लेखक डॉ. अनिल काकोडकर बार्कमध्ये इंजिनियर पदावर जॉईन झाले.

**10. लेखक डॉ. अनिल काकोडकर यांना कोणत्या प्रकियेवर काम करण्यास सांगण्यात आले ?** **[CBSE - SQP 2020 - 21, 2022 - 23]**

**किंवा**

**बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाल्यानंतर लेखकाला कोणते काम करायला सांगण्यात आले ?** **[CBSE - SQP 2023 - 24]**

**उत्तर :** बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाल्यावर लेखक डॉ. अनिल काकोडकर यांना मेटलायझिंग प्रकियेवर काम करण्यास सांगण्यात आले.

**11. मेटलायझिंग प्रकियेवर काम करण्यासाठी लेखक डॉ. अनिल काकोडकर यांनी कोणती मागणी केली ?**

**उत्तर :** मेटलायझिंग प्रकियेवर काम करण्यासाठी लेखक डॉ. अनिल काकोडकर यांनी एक वेल्डर आणि एक फोरमन यांची मागणी केली.

**12. दुसऱ्या अनुभवातून डॉ. अनिल काकोडकर कोणता धडा शिकले ?** **[CBSE 2023]**

**उत्तर :** दुसऱ्या अनुभवातून डॉ. अनिल काकोडकर हा धडा शिकले, की आपल्याला येत नसताना दुसऱ्यांना काम सांगणे योग्य नाही.

## प्र.2. योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

1. तुम्ही सर्वजण ________ करत रहा.
   **A. संशोधन**   B. आविष्कार
   C. काम

2. स्काय इज द लिमिट असे ________ म्हणाले. **[CBSE 2020]**
   A. होमी भाभा
   **B. डॉ. अनिल काकोडकर**
   C. फोरमन

3. मेटलायझिंग प्रकियेवर लेखकांनी यशस्वीपणे काम पूर्ण केले. या मागचे खालीलपैकी कोणते कारण असावे असे तुम्हांस वाटते ? **[CBSE - SQP 2021 - 22]**
   A. वरिष्ठांच्या मदतीने लेखकांनी सगळी कामे केली.
   B. वेल्डर व फोरमन यांच्या मदतीने लेखकांनी सगळी कामे केली.
   **C. लेखकाने स्वत: यंत्रसामग्री हाताळून सर्व धडपड करून सगळी कामे केली.**
   D. लेखकांना ते काम करण्याची आधीपासून सवय होती.

4. नोकरीच्या सुरुवातीच्या काळात लेखकाला वरिष्ठांनी कोणतीही मदत दिली नाही कारण ________
   A. एकटा माणूस जास्त काम करू शकतो.
   **B. स्वत: काम न करता लोक मागण्या करतात.**
   C. लेखकावर वरिष्ठांचा विश्वास नव्हता.

5. लेखक डॉ. अनिल काकोडकर यांचे दोन्ही अनुभव ________ वर्षांपूर्वीचे आहेत.
   A. तीस   B. चाळीस
   **C. पन्नास**

## प्र.3. खालील प्रश्नांची सुमारे 40-50 शब्दांत उत्तरे लिहा.

**1. 'बार्क'ची थोडक्यात माहिती लिहा.**

**उत्तर :** बार्क म्हणजे भाभा अ‍ॅटॉमिक रिसर्च सेंटर म्हणजेच भाभा अणुसंशोधन केंद्र होय. भारतातील अणुसंशोधन क्षेत्रात काम करणारी ही एक प्रचंड मोठी संस्था आहे. भारतातील अणुसंशोधनाचा पाया डॉ. होमी भाभा यांनी घातला. म्हणून, या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले. लेखक डॉ. अनिल काकोडकर कॉलेजचे शिक्षण झाल्यानंतर पुढील प्रशिक्षणासाठी बार्कमध्ये गेले. तिथे त्यांना डॉ. होमी भाभा यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. पुढे याच संस्थेत ते इंजिनियर म्हणून रुजू झाले.

**2. 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ?** **[CBSE - SQP 2023 - 24]**

**उत्तर :** स्वत:चे काम स्वत: निर्माण करावे. आपल्याला काय करायचे आहे ते स्वत:च ठरवावे. बॉसने सांगितले तेवढेच काम केले आणि सांगितले नाही, तर आपल्याला कामच नाही असे समजणे ही प्रवृत्ती गेली पाहिजे. हा होमी भाभा यांनी दिलेला सल्ला ऐकून त्यानुसार वागले तर 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती निर्माण होते.



Sample Content

Page no. **9** to **101** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# 1 शब्दांच्या जाती

## 1. शब्दांच्या जाती (Part of Speech)

आपण आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी बोलतो किंवा लिहितो. या भावना वाक्यांद्वारे आपण प्रकट करतो. कोणतेही वाक्य पूर्ण होण्यासाठी शब्दांची आवश्यकता असते. मराठी भाषेचा विचार केल्यास शब्दांचे काही प्रकार आहेत. शब्दांच्या या प्रकारांनाच शब्दांच्या जाती असे म्हणतात. शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत आणि त्यांचे 'विकारी शब्द' व 'अविकारी शब्द' अशा दोन प्रमुख प्रकारांमध्ये विभाजन केले जाते. ज्या शब्दांमध्ये लिंग, वचन, विभक्तीनुसार बदल होतात, त्यांना विकारी शब्द म्हणतात. ज्या शब्दांमध्ये बदल होत नाही, त्यांना अविकारी शब्द म्हणतात.

शब्दांच्या जाती

| विकारी शब्द | अविकारी शब्द |
|---|---|
| 1. नाम (Noun) | 5. क्रियाविशेषण अव्यय (Adverb) |
| 2. सर्वनाम (Pronoun) | 6. शब्दयोगी अव्यय (Preposition) |
| 3. विशेषण (Adjective) | 7. उभयान्वयी अव्यय (Conjunction) |
| 4. क्रियापद (verb) | 8. केवलप्रयोगी अव्यय (Interjection) |

## नाम (Noun)

कोणतीही व्यक्ती, वस्तू, प्राणी, जागा किंवा गुण यांना दिले जाणारे नाव म्हणजेच नाम होय.

उदा. राम, घोडा, भारत, आनंद, पुस्तक.

नामाचे प्रकार

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|

1. सामान्यनाम: एकाच जातीच्या पदार्थांच्या समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला दिलेले नाव म्हणजे सामान्यनाम होय.
   उदा. नदी, प्राणी, पर्वत, माणूस, देश.
2. विशेषनाम: विशिष्ट व्यक्ती, प्राणी किंवा वस्तूचा बोध होतो, त्या नामाला विशेषनाम म्हणतात.
   उदा. भारत, हिमालय, गंगा, अजय, मुंबई.
3. भाववाचकनाम: व्यक्तीच्या, प्राण्यांच्या, वस्तूच्या प्रत्यक्ष किंवा काल्पनिक गुणधर्म किंवा भावभावनांना दिलेले नाव म्हणजे भाववाचकनाम होय.
   उदा. आनंद, गारवा, श्रीमंती, सौंदर्य, प्रामाणिकपणा.

**Enrich Your Knowledge**

अनेकवचन हे केवळ सामान्य नामाचे होते. इतर दोन्ही प्रकारच्या नामांचे अनेकवचन होत नाही.

Sample Content

Page no. **103** to **105** are purposely left blank. To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# Challenging Grammar Questions

**योग्य पर्याय निवडा.**

1. खालीलपैकी वेगळे वाक्य ओळखा.
   A. मानसीने माळ्यावर पुस्तके जपून ठेवली होती.
   B. रामदासच्या बागेमध्ये सुंदर फुले बहरली होती.
   C. मागे एकदा सायकल चोरीला गेली.
   D. मामाचे नाव घेतले अन् मामा दारासमोर हजर झाला.

2. गटात न बसणारा पर्याय ओळखा.
   A. वारू - हय
   B. ऐरावत - कुंजर
   C. सिंह - शार्दूल
   D. मृगेंद्र - केसरी

3. समानार्थी शब्दांची योग्य जोडी निवडा.
   A. जया - भार्या B. अबाल - नारी
   C. वन्ही - पावक D. पाणि - तोय

4. विरुद्धार्थी शब्दांची अचूक नसलेली जोडी ओळखा.
   A. अमावस्या × पौर्णिमा
   C. मर्त्य × अमर्त्य
   B. कृश × स्थूल
   D. राग × लोभ

5. खालील गटातील शब्द वाचून योग्य पर्याय निवडा.
   i. पांढरे × शुभ्र
   ii. मृत × जित
   iii. राव × रंक
   iv. विघातक × विधायक
   A. विधान 'i' व 'ii' योग्य
   B. विधान 'ii' व 'iii' योग्य
   C. विधान 'i' व 'ii' अयोग्य
   D. विधान 'iii' व 'iv' योग्य

6. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द ओळखा.
   A. धर्माधर्म B. चटणीभाकर
   C. बटाटेवडा D. कृष्णार्जुन

7. खालीलपैकी वेगळे विधान ओळखा.
   A. सरू विचार करत आहे.
   B. आकाशात चांदण्या खूलत आहेत.
   C. अमर सतत अभ्यास करत असे.
   D. अनेक दिवस हा कार्यक्रम सुरू आहे.

8. वाक्यातील नामांपैकी वेगळे नाम ओळखा.
   रात्रीच्या शांततेत गूढता तर होतीच; पण तेवढेच सौंदर्यही भरले होते.
   A. रात्र B. शांतता
   C. गूढता D. सौंदर्य

9. रिकाम्या जागी योग्य पर्याय योजा.
   लताच्या घरी समृद्धी आली _______ सुख पाठ फिरवून निघून गेले.
   A आणि
   B. पण
   C. मात्र
   D. वरील सर्व पर्याय योग्य

10. अरुंधती विचारी, संस्कारी मुलगी असूनही तिने वयोवृद्ध आजींचा अपमान केला.
    वेगळा पर्याय ओळखा.
    A. विचारी B. संस्कारी
    C. वयोवृद्ध D. अपमान

11. अयोग्य जोडी ओळखा.
    A. पाठ - पुल्लिंग
    B. पाठ - स्त्रीलिंग
    C. मान - पुल्लिंग
    D. नख - पुल्लिंग

12. अयोग्य गटाचा पर्याय निवडा.
    A. सीमा, राख, चूल, वेणी
    B. ढोल, फटका, वाद्य, भोंगा
    C. धोतर, नाक, कुंकू, पंचपाळ
    D. तारा, चंद्र, सूर्य, ढग

Sample Content

Page no. **5** to **10** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

## अपठित गद्यांश

**प्र.1. खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[CBSE - SQP 2023 - 24]**

मित्रांनो, सृष्टीचे सहृदय मित्र बना. तृणपर्णावरचे दवबिंदू पाहा. ते मोती बघा आणि गवतातून कोळ्यांनी विणलेली जाळी! सूर्यकिरणांनी रंगलेली जणू सोनेरी मोत्यांच्या झालरी लावलेली परींची ती हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे! बघा ती मौज आणि पहाटेच्या प्रशांत वेळी झाडांवरून थेंब पडतात. जणू अश्रू- ते ऐका. ते निळे डोंगर बघा; खोल दऱ्या, नद्या, नाले, तळी, वृक्षवेली, फुले, पाखरे-सारे पाहा. एखादे साधे फूल; परंतु किती सुंदर असते! टेनिसन म्हणाला, “एक फूल जाणणे म्हणजे विश्वच जाणणे!” फुला- पाखरांच्या अंगावरची नक्षी बघा. फुलपाखरांच्या मागे धावा. कोकिळेला शोधीत फिरा. घुबडांचे घुत्कार ऐका. नाचणारे मोर बघा. गायी,बैल, मांजरे, त्यांचे डोळे बघा- गंमत आहे.

खालचे वरचे सारे विश्व पाहा. आकाशातील रात्रीचे काव्य पाहा. वेदांतील ऋषींनी मध्यान्हीच्या निळ्या-निळ्या आकाशाचेही वर्णन केले आहे! आम्ही पहाटेचेही पाहणार नाही, मग मध्यान्हीचा धगधगीतपणा नि त्यातील प्रखर सौंदर्य पाहणे दूरच राहिले! तुम्हांला ताऱ्यांचे कधी आकर्षण वाटले आहे? निळ्या आकाशाने कधी तुम्ही वेडे झाला आहात? काजव्यांची कवाईत पाहिली आहे? प्रकाशाची कवाईत!

**a. उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा.**

1. लेखकाने वाचकांना सृष्टीचे कसे मित्र बनण्यास सांगितले आहे?

(A) लाडके (B) खास
**(C) सहृदय** (D) जवळचे

2. पहाटेच्या वेळी झाडावरून पडणाऱ्या थेंबांना लेखक कशाची उपमा देतात?

(A) दवबिंदूंची (B) अश्रूंची
(C) मंदिरांची **(D) मोत्यांची**

3. ‘आकाशातील रात्रीचे काव्य’ म्हणजे ........... होय.

(A) एखादे महाकाव्य
(B) रात्रीची शांतता
**(C) चंद्र, तारे यांनी प्रकाशित आकाश**
(D) काळेभोर आकाश

4. मध्यान्हीच्या आकाशाचे वर्णन ऋषींनी कोठे केले आहे?

**(A) वेदांमध्ये** (B) काव्यात
(C) ग्रंथात (D) सृष्टीमध्ये

**b. खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा.**

**1. लेखक गवतातील कोळ्यांच्या जाळ्यांविषयी काय म्हणतात?**

**उत्तर:** लेखक गवतातील कोळ्यांच्या जाळ्यांविषयी सूर्यकिरणांनी रंगलेली, जणू सोनेरी मोत्यांच्या झालरी लावलेली परींची हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे असे म्हणतात.

**2. लेखकाने आपल्याला कोणते विश्व पाहायला सांगितले आहे?**

**उत्तर:** लेखकाने आपल्याला खालचे सारे विश्व पाहा असे सांगितले आहे. म्हणजेच निसर्ग आणि आकाश बारकाईने पाहण्यास सांगितले आहे.

**3. टेनिसनच्या मते एक फूल जाणणे म्हणजे काय ?**

**उत्तर:** टेनिसनच्या मते “एक फूल जाणणे म्हणजे सारे विश्वच जाणणे!”

**4. लेखक कोणत्या दृश्याला प्रकाशाची कवाईत असे म्हणतात?**

**उत्तर:** लेखक काजव्यांच्या चमकण्याच्या दृश्याला प्रकाशाची कवाईत असे म्हणतात.

**c. उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

**1. निसर्गातील गंमत अनुभवण्यासाठी लेखक आपल्याला कोणता सल्ला देतात?**

**उत्तर:** लेखक आपल्याला निसर्गाशी मैत्री करण्यास सांगतात. तृणपर्णावरील तसेच झाडांवरून पडणारे दवबिंदू, कोळ्यांनी विणलेली जाळी यांची गंमत अनुभवण्यास सांगतात. निळे डोंगर, खोल दऱ्या, नद्या, नाले, तळी, वृक्षवेली, फुले, पाखरे हे सर्वच पाहण्यास सांगतात.

Sample Content

Page no. **139 to 161** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# 1 निबंधलेखन



'निबंधलेखन' हा प्रकार तुमची मराठी भाषेची परीक्षा घेणारा असतो. तुमचे मराठी भाषेचे ज्ञान, सभोवताली घडणाऱ्या घटनांची जाण, तुमचे आकलन, तुमची भाषा, तुमचा इतर अभ्यास, तुमचे विचार मांडण्याचे कसब या सगळ्या गोष्टींची चाचपणी या लेखनातून केली जाते.

आपल्या भावना, कल्पना आणि सर्जनशीलता यांचा आविष्कार शब्दांकित करणे म्हणजेच 'निबंधलेखन' होय. स्वविचारांचे प्रकटीकरण ही क्षमता / कौशल्य आत्मसात करण्यासाठी निबंधलेखनाचा सराव होणे अत्यंत आवश्यक असते. यात विचारांची विषयानुरूप, मुद्देसूद मांडणी केली जाते.

निबंधलेखन करताना तुमच्या लेखनाच्या विषयाची मांडणी, त्यातील मुद्दे, योग्य भाषा या गोष्टी पाहिल्या जातात. थोडक्यात, तुमच्या भाषासौंदर्याची, लेखनकौशल्याची कसोटी लागते. लेखनसौंदर्य ही लेखनाची एक बाजू; पण लेखनात सोपी, सरळ, सहज भाषा वापरूनही आपण अतिशय सुंदर लेखन करू शकतो. पुढील काही गोष्टींची काळजी घेतल्यास तुमचे लेखन उत्कृष्ट होईल यात शंका नाही.

**निबंधात खालील गोष्टींवर लक्ष द्यावे.**

- विषय ज्ञान तर्कशक्ती व त्याची सलग मांडणी
- मुद्देसूदपणा
- आकर्षक आरंभ व शेवट
- म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती यांचा योग्य वापर
- हस्ताक्षर व शुद्धलेखन
- विरामचिन्हांचा यथायोग्य वापर
- उपयोजन कौशल्य/समर्पक शेवट

**लक्षात ठेवा**

1. दिलेल्या विषयांपैकी तुम्ही कोणत्या विषयावर लिहू शकता, याचा प्रथम विचार करा.
2. ज्या विषयाची जास्त, तसेच योग्य माहिती आहे त्याचा विचार करूनच विषय निवडा.
3. त्या विषयावर आधारित काही महत्त्वाच्या ओळी, एखादी जुनी बातमी, सुविचार, संबंधित व्यक्ती या गोष्टींचाही विचार करा.
4. शुद्धलेखनाच्या चुका होणार नाहीत याची काळजी घ्या.
5. आपल्या लेखनातून नवा विचार देण्याचा प्रयत्न करा.
6. तुमचा प्रत्येक मुद्दा लेखनाच्या विषयाला धरून असेल याकडे लक्ष असू द्या.

**यावर्षी अभ्यासासाठी पुढील निबंधलेखन प्रकारांचा समावेश आहे:**

1. आत्मवृत्त / आत्मकथनात्मक निबंध 2. कल्पनात्मक निबंध 3. वर्णनात्मक निबंध

**1. आत्मवृत्त / आत्मकथनात्मक निबंध:**

एखादी सजीव व निर्जीव वस्तू स्वत:च स्वत:च्या आयुष्यातील गोष्टींचे, आपल्या सुख-दु:खांचे कथन करत आहे, अशी कल्पना करून केलेले लेखन म्हणजे आत्मकथनपर लेखन होय. अशा प्रकारच्या लेखनाला मनोगत, आत्मनिवेदन, आत्मवृत्त, कैफियत असे निरनिराळे शब्दही वापरले जातात.

Sample Content

# AVAILABLE BOOKS FOR CLASS X :

## CBSE PERFECT PREP

- English Language and Literature
- हिंदी 'ब' स्पर्श व संचयन भाग - २
- मराठी
- Social Science
- Science
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)

## NCERT TEXTBOOK & EXEMPLAR

- Science
- Mathematics

## ADDITIONAL TITLES

- Competency Based Questions Science
- Competency Based Questions Mathematics
- CBSE English Grammar & Writing Skills




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

Visit Our Website

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY